# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


**प्रेसनोट क्रमांक :- १७४-२२** **दिनांक :- ०९/०६/२०२२**

## घरफोडी करणा-या आरोपीस अटक करुन एकुण २,३८,००५/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत- नालासोपारा पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक ०५/०६/२०२२ रोजी फिर्यादी सौ. केशरी प्रदीप गुप्ता वय-३५ वर्षे यांनी नालासोपारा पोलीस ठाण्यात येऊन तक्रार दिली की, फिर्यादी या दिनांक ०२/०६/२०२२ रोजी भायखळा, मुंबई येथे त्यांचे नातेवाईकाकडे कामानिमीत्त राहण्यास गेल्या होत्या. राहते घरातुन जातांना त्यांनी घराचे कुलूप बंद करुन गेल्या होत्या. त्यानंतर फिर्यादी या दिनांक ०४/०६/२०२२ रोजी रात्रौ उशीराने घरी परत आल्या असता त्यांना त्यांचे घराचा दरवाजाची कडी तुटलेली दिसली. फिर्यादी यांनी त्यांच्या घराची पाहणी केली असता त्यांना त्यांच्या घरातील व कपाटातील सामान अस्ताव्यस्त पडलेले दिसुन आले. तसेच कपाटात ठेवलेले २२ ग्रॅम वजनाचे चांदीचे ब्रेसलेट व रोख रक्कम ३,००० असा एकुण ४,५००/- रु. किंमतीचा ऐवज घरफोडी चोरी झालेले दिसुन आले. सदरबाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन नालासोपारा पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. I २२८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० प्रमाणे अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदरील गुन्हा उघडकीस येण्याच्या दृष्टीकोनातून वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी सुचना दिल्याप्रमाणे नालासोपारा पोलीस स्टेशनच्या गुन्हे प्रकटीकरण पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचा तपास सुरु केला. घटनास्थळावरील प्राप्त पुरावे व तांत्रिक माहितीच्या आधारे गुन्हयाचा तपास केला असता गुन्हयातील आरोपी हा नालासोपारा पोलीस ठाणेच्या कार्यक्षेत्रामध्ये राहण्यास असल्याबाबत गोपनीय माहिती मिळाली. संशयीताबाबत अधिक माहिती प्राप्त करुन आरोपी नामे अरबाजअली मोसीन मलीक वय-२४ वर्षे रा. खारखंडी मोहल्ला, सोपारागाव, नालासोपारा पश्चिम यास दिनांक ०६/०६/२०२२ रोजी अटक करण्यात आली. अटक आरोपीताकडे अधिक तपास करता त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली. आरोपीकडे सखोल चौकशी केली असता त्याने नालासोपारा पोलीस ठाणे कार्यक्षेत्रामध्ये मागील काही दिवसामध्ये केलेल्या खालीलप्रमाणे १० गुन्हयांची कबुली दिली असून त्यांचेकडून गुन्हयात चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी २,३८,००५/- रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

| अनु.क्र | गुन्हा रजिस्टर क्रमांक व कलम |
|---|---|
| ०१ | गुन्हा रजि. नं. I २२८/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये |
| ०२ | गुन्हा रजि. नं. I ७७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये |
| ०३ | गुन्हा रजि. नं. I ११०/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |
| ०४ | गुन्हा रजि. नं. I १३९/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५७, ३८० अन्वये |
| ०५ | गुन्हा रजि. नं. I १७७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये |
| ०६ | गुन्हा रजि. नं. I २१७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये |
| ०७ | गुन्हा रजि. नं. I २२२/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये |
| ०८ | गुन्हा रजि. नं. I २२४/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये |
| ०९ | गुन्हा रजि. नं. I २२९/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ४५४, ४५७, ३८० अन्वये |
| १० | गुन्हा रजि. नं. I १६७/२०२२ भा.दं.वि.सं.कलम ३९२,४५२ अन्वये |

गुन्हयातील अटक आरोपीविरुध्द निर्मळनगर पोलीस ठाणे, मुंबई येथे घरफोडी चोरीचे एकुण ७ गुन्हे दाखल असुन त्यास निर्मळनगर पोलीस ठाणे कार्यक्षत्रातुन हद्दपार केल्याबाबतची माहिती मिळुन आलेली आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-०३, चंद्रकांत जाधव, सहा. पो.आयुक्त नालासोपारा, विलास सूपे, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, नालासोपार पोलीस ठाणे, राहुल सोनावणे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), सपोनि/पंडीत मस्के, सपोनि/अमोल तळेकर, पोहवा/आदिनाथ कदम, पोहवा/किशोर धनु, पोना/सचिन कांबळे, पोशि/सचिन मोहिते, पोशि/राजेश नाटुलकर, पोना/ढोणे ( नेमणुक-पोलीस उप आयुक्त कार्यालय ) यांनी केलेली आहे.

------------ooooooo----------------